# स्त्री आत्मकथन

प्रा. चंद्रकुमार नलगे

डॉ. गंगाधर पानतावणे

रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

B133

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**आगराळ : चंद्रकुमार नलगे, गंगाधर पानतावणे**
'चंद्रबन', साहित्य निवास कॉलनी,
उजळाईवाडी, कोल्हापूर.
फोन : ०२३१ - २६७७०३४

© **शितल मेहता**
कोल्हापूर.

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रविंद्र सावंत

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंती प्रिंटरी

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
रुपये १५०/-

स्त्री जागरणाचा पहिला प्रभावी उद्‌गार
महात्मा जोतिराव फुले
व
सावित्रीबाई फुले यांना

# ‘स्त्री आत्मकथन’च्या निमित्ताने.....

संस्कृती आणि सभ्यतेच्या इतिहासापासूनच ‘स्त्री आणि पुरुष’ यांच्या अस्तित्वाचा विचार मांडला जातो. ‘स्वातंत्र्य’ हे तत्त्वही तेव्हापासूनच विचाराधीन राहिले. प्लेटोने स्त्रीच्या हक्काचा विचार आपल्या राज्यात चिंतिला नसला तरी तिच्या कर्तव्याचा विचार मांडताना 'as far as the state is concerned there is no difference between the natures of man and woman' असे म्हटले होते. संस्कृत वाङ्मयातही स्त्री ही सखी, सहचरी, देवता अशा विशेषणांनी गौरविली गेली. ‘जननी’ ही ‘स्वर्गादपि गरीयसी’ अशी संभावनाही केली गेली. मैत्रेयी, गार्गी या विदुषींचा गौरवही अपवादात्मक असला तरी उच्च स्वरात केला जातो. भारतात मातृसत्ताक पद्धती होती हे सांगण्यामागे स्त्रीच्या महतीचा एक दृष्टिकोनही स्वीकारला जातो. ऐतिहासिक दृष्टीने स्त्रीच्या सन्मानाचा आधार बुद्धकाळात व बुद्धवाङ्मयात आढळतो. ही क्रांती होती; पण नंतर या देशात प्रतिक्रांती झाली आणि पुनरुज्जीवनवाद उसळून आला. स्त्री-शूद्रांची प्रतिष्ठा पायदळी तुडविली गेली. मानवी अवमूल्यनाचे एक युगच अस्तित्वात आले. ज्या भारतात स्त्रीला ‘देवता’ कल्पिले त्याच भारतात ‘स्त्री हे नरकाचे दार’ संबोधिले गेले. अनेक धर्मग्रंथात स्त्रीची निंदा करण्यात आली. तिला अविश्वासाचे माहेर, अज्ञानाचा अंधार, पायाची दासी मानले गेले. पुरुष सत्तेच्या अहंकारातून, धर्मग्रंथाच्या आडोशाने स्त्रीप्रतिमा मलीन करण्याचे प्रयत्न झाले. त्याचे परिणाम इतके खोलवर झाले की, आध्यात्मिक लोकशाही स्थापन करण्याच्या ईर्ष्येला पेटलेल्या संतांनीही स्त्री ही आध्यात्मिक मार्गातील धोंड, इंगळी, डोळ्याला पाणी आणणारा कांदा इ. शेलक्या शब्दांनी तिची प्रतिमा उभी केली. एखादा तुकारामासारखा संत ‘स्त्री मातेसमान’ म्हणालाही; परंतु सामाजिकदृष्ट्या तिचे समान स्थान स्वीकारल्याचा कुठे निर्देश नाही. जगात सर्वत्रच स्त्रीकडे पाहण्याचा हा दृष्टिकोन होता. चीनमधील श्रेष्ठ तत्त्वज्ञ आणि

संत कॉन्फुक्युअस स्त्रियांचा कैवारी होता; पण त्यानेही स्त्रिया या मानव असल्यातरी त्यांचे स्थान पुरुषांपेक्षा कमी दर्जाचेच आहे, असे म्हटले. निसर्ग–नियमाप्रमाणेच स्त्रीला स्वतंत्रपणे, स्वत:च्या इच्छेने वागता येणार नाही असेच त्याने प्रतिपादन केले. स्त्री ही भोग्य, परक्याचे धन, परावलंबी हीच प्रतिमा समाजजीवनात शतावधी वर्षे स्थिर राहिली. भारत त्याला अपवाद कसा राहणार ? परंतु फ्रेंच राज्यक्रांतीने पुन: एकदा स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाचा उद्घोष केला आणि बुद्धानंतर एक नवे जागरण पुन: उदयाला आले. जगभर त्याचे पडसाद उमटले. हे एक सत्य असले तरी त्या तत्त्वातील धूसरता शोधण्याचाही प्रयत्न झाला. सुप्रसिद्ध समाजवादी विचारवंत रिचर्ड हेन्री टॉनी यांनी फ्रेंच क्रांतीतील ‘समानता’ या कल्पनेचा संबंध केवळ स्वातंत्र्य व बंधुत्व यांच्याशी जोडला. कोणत्याही समाजातील सर्व माणसे सारखीच बुद्धिमान अथवा सारखीच सद्गुणी असणे म्हणजे समानता असा अर्थ, जगापुढे समानतेचा आदर्श मांडणाऱ्या फ्रेंचांनीही केला नव्हता असे त्याने प्रतिपादन केले; परंतु हेही लक्षात घेतले पाहिजे की, फ्रान्समधील आर्थिक असमतोल आणि न्यायदानातील पक्षपात यामुळे जरी फ्रेंच क्रांतीने समानतेचा उद्घोष केला असला तरी तेवढ्यापुरतीच समानतेची कल्पना बंदिस्त नव्हती. पैतृक संपत्तीच्या वाट्याबरोबरच शैक्षणिक व नागरी हक्कही या क्रांतीने स्वीकारला होता. एवढेच नाही तर याच काळातील फ्रेंच विचारवंत होल्बाक, मेरी ऑस्टेल, कॅथरिन मेकॉले यांनी स्त्रीच्या सामाजिक न्यायाचा जो वारंवार आग्रह धरला तो त्या क्रांतीचाच परिपाक होता. आणखी एक विशेष म्हणजे फ्रेंच राज्यक्रांतीनंतर, लगेच १७९२ साली मेरी विलस्टोन क्रॉफ्ट या स्त्री लेखिकेने 'Vindication of the Rights of Women' हा जो ग्रंथ लिहिला, त्यामुळे जगाला स्त्री आता जागृत झाली आहे, याचे आकलन झाले.

भारताच्या दृष्टीने एकोणिसावे शतक हे प्रबोधनाचे शतक आहे आणि या शतकातच स्त्रीशिक्षणाचा, तिच्या प्रतिष्ठेचा आणि तिच्या अस्तित्वाचा विचार प्रभावीपणे मांडला गेला. इंग्रजी राजवटीचे आगमन हेही त्याला एक कारण होते. सार्वत्रिक शिक्षणाचा कायदा ही तर त्याची नांदी होती. त्यातूनच कायदा, संरक्षण, विचारस्वातंत्र्य, अभिव्यक्तिस्वातंत्र्य, स्त्री–पुरुष समानतेचा विचार सबल झाला. त्याचे प्रत्यक्ष कितपत आकाराला आले हा प्रश्न अनुत्तरित असला तरी त्याचे पडसाद जनमानसात उमटले हे त्या वेळच्या समाजचिंतकांच्या विचारांवरून स्पष्ट दिसते. तसे पाहिले तर स्वातंत्र्योत्तर काळात संविधानाने सामाजिक लोकशाहीचा स्वीकार करूनही समाजक्रांती किती झाली हा प्रश्नच आहे. मग एकोणिसाव्या शतकात प्रबोधनाच्या आरंभकाळी आमूलाग्र परिवर्तन कदापि शक्य नव्हते, आणि म्हणूनच शक्याशक्यतेनेच हे वास्तव स्वीकारले पाहिजे. या नव्या विचारांनी पारंपारिकता, रूढीग्रस्तता, अविवेकी समाजमानस आणि अन्याय्य विचारसरणीला मोठाच हादरा बसला, यात शंका नाही. त्याचे समाजमनावर परिणाम झालेच झाले.

भारतीय आणि विशेषत: महाराष्ट्राचा विचार करू जाता, एकोणिसाव्या शतकातील समाजचिंतकांनी स्त्रियांच्या प्रश्नांना नि:संशयपणे वाचा फोडली. म. जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या रूपाने एकोणिसाव्या शतकाच्या मध्यकाळात अत्यंत प्रभावीपणे आणि प्रखरपणे, स्त्रीविमोचनाच्या कार्याला आरंभ झाला. स्त्रीचे अस्तित्व परप्रकाशी नाही तर ते स्वयंसिद्ध आणि स्वयंप्रकाशी आहे असा नवा परिवर्तननिष्ठ विचार त्यांनी रुजविला. हिंदू समाजाने धर्मग्रंथांचा आश्रय घेऊन स्त्रीची जी अवहेलना चालविली होती, त्यावर त्यांनी आघात केले; स्त्रीला विचारप्रवृत्त करावयाचे असेल तर तिला ‘विद्याप्रवृत्त केले पाहिजे, त्यातच तिचे भवितव्य आहे या विचारातून त्यांनी स्त्री–शूद्रांच्या शाळांचा प्रपंच केला. स्त्रीला शाळेची आणि शिक्षणाची दारे मुक्त झाली की, ती स्वत:चे अस्तित्व निर्माण करू शकेल यावर त्यांचा विश्वास होता. ज्ञानाच्या किल्ल्या आमच्या कंबरेला आहेत हा अहंकार फुल्यांनी ठेचला तो स्त्री–शूद्रांना ज्ञानप्रवृत्त करून. या नव्या जाणिवा होत्या. संघर्षाशिवाय फुल्यांना या नव्या जाणिवा रुजविता येणे अशक्य होते. म. फुले हा स्त्री–जागरणाचा पहिला प्रभावी उद्गार होय. भारतीय स्त्रीचा मार्गदाता आणि विमोचक म्हणून त्यांचे स्थान अढळ आहे.

एकीकडे स्त्री–प्रबोधन तर दुसरीकडे पुनरूज्जीवनवादाचे बदसूर गाणे. त्यातूनच, स्त्रिया शिकल्या तर त्या संशयवृत्ती होतील आणि आमची कुटुंबसंस्था उद्ध्वस्त होईल, असाही विचार बळावत गेला. या अशा संघर्षांमुळे स्त्री–प्रबोधनाला इष्ट ती गती एकोणिसाव्या आणि पुढे विसाव्या शतकातही प्राप्त होऊ शकली नाही. फुल्यांच्या क्रियाशीलतेकडे तर त्या काळातील पुनरूज्जीवनवाद्यांनी कुचाळकीने आणि कमालीच्या संशयग्रस्ततेने पाहिले होते.

प्रतिक्रियावादी म्हणत, स्त्रियांना समान हक्क दिले तर त्या सभासंमेलनाला जातील, वृत्तपत्रात लेख लिहितील, स्वतंत्र विचार मांडतील, विज्ञानक्षेत्रात प्रवेश करतील, महत्त्वाच्या व जबाबदारीच्या जागांवर त्यांची नियुक्ती होईल, त्या प्रशासक होतील, औद्योगिक क्षेत्रे काबीज करतील, बाहेरच्या अनेक क्षेत्रात त्या आघाडीवर राहतील आणि त्यामुळे स्त्रीचे नैसर्गिक 'मातृत्वस्वरूप' नष्ट होऊन जाईल. 'चूल आणि मूल' संस्था दुभंगेल. स्त्रीत्वाला कलंक लागेल. स्त्रीची परंपरागत प्रतिमा विध्वंस पावेल, अशा अविवेकी आणि कालबाह्य विचारसरणीने फुले डगमगले नाहीत. प्रचंड प्रतिरोधाला सामोरे जाऊनच त्यांनी स्त्री विमोचनाचा शकट पुढे नेला. महाराष्ट्रातील अनेक समाजचिंतकांनीही हा शकट गतिमान करण्यासाठी सायास केले आणि महाराष्ट्रातील मराठी स्त्री शिक्षित झाली, विचारप्रवृत्त झाली आणि संघर्षोन्मुख बनली. याचा अर्थ हा नव्हे की, समाजात तिला पूर्णत: समानतेचे स्थान मिळाले किंवा ती सर्वार्थाने मुक्त झाली. आजच्या स्त्री-मुक्तीच्या चळवळी पुरेशा बोलक्या आहेत. स्थितिशील, पुनरूज्जीवनवादी, प्रतिक्रियावादी शक्ती आजही अस्तित्वात आहेत. असे असले तरी म. जोतीरावांनी लावलेले स्त्री-संस्काराचे व स्त्रीजागृतीचे रोपटे करपलेले नाही. आज मराठी स्त्री कार्यकर्ती आहे, लेखिका आहे, प्रशासक आहे, हीच त्याची फलश्रुती. हीच मराठी स्त्री लेखिका म्हणून वाङ्मयाच्या विविध प्रांतात सक्षमतेने पदक्षेप करीत आहे. 'आत्मकथन-आत्मचरित्र' हा तिचा एक लक्षणीय असा प्रांत.

आत्मचरित्र हे आत्मकथनच असते. आपल्याला काही तरी सांगायचे आहे, हीच प्रेरणा या आत्मकथनामागे असते. कोणीतरी म्हटले आहे की, आत्मकथन हा वाङ्मयप्रकार चकवा देणारा असतो. काही प्रमाणात ते खरेच आहे. दुसऱ्यासंबंधी लिहिणे-म्हणजे चरित्रलेखन सोपे असते, मात्र स्वत:संबंधी स्वत: लिहिणे अवघड असते. खरे तर आत्मकथन ही एक प्रकारे स्मरणसाखळीच असते. पूर्वायुष्यातील अनेक घटना, स्मृती स्वत:च्या मनाच्या मुशीतूनच उभ्या करावयाच्या असतात. हा 'मी' अनेक स्थितीतून आणि स्थित्यंतरातून परिभ्रमण करीत आलेला असतो. त्यामुळे 'मी'शी निगडित असणाऱ्या प्रिय-अप्रिय व्यक्ती, संस्था, समाज, राजकारण यांचा 'मी'च्या मनावर सतत आघात झालेला असतो आणि या आघातालाच संस्कार अशी संज्ञा दिली जाते. हे सारेच आपल्या कथनातून प्रतिबिंबित होते. पुष्कळदा स्मरणावर विसंबून राहूनच पूर्वकाळ उभा करावा लागतो. त्यामुळे सत्याचा अपलाप घडण्याचीही शक्यता असते. सत्यापलाप हा आत्मकथनाचा एक दोष जसा संभवतो, त्याप्रमाणे आत्मतृप्ती हाही एक दोष संभवतो. आपले आयुष्य सुखाचे-समाधानाचे - आत्मतृप्तीचे आहे अशा कल्पनेमुळे आत्मपरीक्षण किंवा आत्मटीका संभवत नाही. म्हणजे एकीकडे जीवनसत्य प्रतिपादण्याचा हव्यास, तर दुसरीकडे जाणीवपूर्वक आत्मवंचना असा पेच निर्माण होतो. त्यातूनच 'आत्मीय' आणि 'दूरस्थ' अशा व्यक्तिपरत्वे जाणिवाही निर्माण होतात, आत्मपूजनाची प्रवृत्ती वाढीला लागते. आत्मसमर्थनाचा हव्यासही बळावतो आणि मग आत्मकथनकार बचावाची भूमिकाही घेत जातो.

आत्मकथनकाराच्या जीवनातील प्रत्येक घटनेमागे योजकता, हेतू-पूर्वकता किंवा निश्चितता असतेच असते. त्यामुळे पूर्वजीवनातील अनेक घटनांचा आणि त्या घटनांशी संबंधित असणाऱ्या व्यक्तीचा संदर्भ केवळ स्मरणपातळीवर राहतो. त्यामुळे पुष्कळदा व्यक्ती आणि घटना पारखून घेणे अशक्य असते. स्वत:ला प्रत्येक वेळी दोषमुक्त राखण्याची धडपडही मग दोषरूप होते. वाचकांच्या मनात आपल्यासंबंधाने किंतू निर्माण होऊ नये किंवा अपसमज निर्माण होऊ नये या समजापोटी, सावधता म्हणून आत्मकथनकार सत्यापासून दूर दूर जात राहतो. यामुळे आत्मकथनातील प्रतिपाद्य पुष्कळदा निर्लेप, उत्कट किंवा दोषरहित होत नाही. प्रदर्शनीय मात्र होण्याची शक्यता असते. या अशा आत्मलीन वृत्तीमुळे जगाकडे पाहण्याची दृष्टी बदलते. वस्तुत: ज्या आयुष्याच्या मावळतीला प्राधान्याने ही आत्मकथने लिहिली जातात त्यावेळी चिंतनशील मनाची अपेक्षा करणे गैर नाही. पूर्वायुष्यातील प्रवासाचा अन्वयार्थ लावताना समचित्ततेने त्याचे शब्दांकन व्हायला हवे. अर्थातच पुरेशा गांभीर्याची आणि पूर्वजीवनाकडे तटस्थ राहून पाहण्याची एक अवस्था निर्माण व्हायला हवी. यालाच आत्मशोध म्हणता येईल. हा आत्मशोधच इतिहासाची वर्तमानात मांडणी करताना संतुलन राखतो. आत्मकथनकाराने त्याचे आत्मसामर्थ्य व अंत:सामर्थ्य हेच त्याचे व्यक्तित्व असते याचे भान राखायला पाहिजे. त्याशिवाय त्याला कृतकता, बाह्यावडंबर, उसनेपणा किंवा अर्थहीन आत्मसमर्थन यापासून दूर राहता येणार नाही. लिप्तता

हा मानवी स्वभाव असला तरी आत्मकथनकार जेव्हा लेखकांच्या भूमिकेत असतो तेव्हा त्याला त्यापासून अलिप्त राहता आले पाहिजे. त्याशिवाय त्याच्या आत्मकथनाला अर्थपूर्णता प्राप्त होणार नाही.

मराठीतील आत्मचरित्रांचा विचार करताना स्त्री आत्मकथनाचा विचार 'दाक्षिण्या'च्या भावनेतून करणे सर्वस्वी गैर आहे. एवढेच नाही तर ती केवळ पतिसहवासाची चित्रे किंवा पतिचरित्रे होत असे म्हणणेही अप्रस्तुत ठरेल. त्या भूमिकेतून स्त्री-आत्मकथनाकडे पाहणे अनौचित्य-पूर्ण होईल. स्त्रीच्या जीवनाची घडण ज्या संस्कारांनी झाली, ज्या अंगांनी झाली, त्याचे प्रतिबिंबच या आत्मकथनातून प्रकट झालेले असते. काही अनुभवचित्रे पतिसहवासाने भारावलेली म्हणून कृतज्ञ किंवा दबलेली आहेतही. परंतु अनेक आत्मकथनांतून स्त्रीच्या स्वतंत्र घडणीची, तिच्या आशाआकांक्षांची, तिच्या रागा-लोभाची, तिच्या कर्तव्याची व कर्तव्यच्युतीची अशी अंगेही प्रतीत होतात. पंडिता रमाबाईंच्या लेखनातून हिंदू कुटुबंसंस्थेचे दाहक चित्र आणि परधर्मासंबंधीची अपरिहार्य ओढ प्रतीत होते. त्यामुळे ते लेखन केवळ सुखदु:खाचे गणित मांडत नाही. एका वेगळ्या मानसिकतेचे दर्शन त्यातून घडते. सावित्रीबाईंची पत्रे म्हणजे समाजजीवनाचा आरसाच वाटतो. दलित स्त्री-लेखिकांची आत्मकथने एका वेगळ्याच अनुभवविश्वात वाचकांना घेऊन जातात. त्यातून समाज, संस्कृती आणि धर्मव्यवस्थेचा एक वेगळाच कालपट उभा राहतो. तेव्हा स्त्री-आत्मकथने ही निव्वळ पतिचरित्रे नसतात तर तो एक समाज, संस्कृती आणि धर्म यांच्या संस्काराचा मानसिक प्रवास असतो हे लक्षात घ्यायला हवे. स्मृतिचित्रे, अंत:स्फोट, जेव्हा माणूस जागा होतो किंवा 'सांगत्ये ऐका' यांचा या संदर्भात उल्लेख करता येईल.

पंडिता रमाबाई ते मल्लिका अमर शेख हा विविध अनुभवचित्रांचा प्रवास आहे. पंडिता रमाबाईंची साक्ष म्हणजे एका नव्या जीवनाची चिकित्सा तर सावित्रीबाईंचे निवेदन म्हणजे पुराण संस्कृती आणि नवमूल्ये यांचा अप्रतिहत संघर्षच. रमाबाई रानड्यांच्या आयुष्यातील आठवणीतून एक पतिपरायण, संस्कारक्षम, ईश्वरनिष्ठ स्त्री दृगोचर होते तर पार्वतीबाई आठवले यांची कहाणी म्हणजे काळाचे आव्हान स्वीकारीत स्वत:ला घडविणाऱ्या सश्रद्ध पण कर्तृत्ववान स्त्रीचे प्रगट रूपच. जीवनाकडे काळवंडलेल्या नजरेने न पाहता आशावादित्वाचा किरण घेऊन वाटचाल करणाऱ्या लक्ष्मीबाईंची स्मृतिचित्रे म्हणजे मराठी साहित्याचे चिरलेणेच. यशोदाबाई आगरकरांनी आपल्या कर्तृत्ववान पतीच्या सांगितलेल्या आठवणींनी किती तरी नव्या घटनांवर प्रकाश पडला आहे. आनंदीबाई कर्व्यांच्या आत्मपुराणातील मनस्वीपणा, कमलाबाई देशपांड्यांच्या स्मरणसाखळीतील अर्थहीन आत्मसमर्थने, लीलाताई पटवर्धनांनी कविपतीच्या सहवासातील चितारलेले बुद्धिवादी क्षण, आनंदीबाई शिर्के यांच्या 'सांजवाती'तील खानदानी मराठा कुटुंबातील वातावरण, डॉ. केतकरांसारख्या असामान्य बुद्धीच्या सान्निध्यात हिंदू म्हणून निष्ठेने जगणाऱ्या शीलवतीबाई केतकरांची समायोजकता, नृत्यसाधनेतील कडूगोड अनुभवांबरोबरच रोहिणी भाट्यांनी परजलेला ध्येयवाद, दुर्गाबाई खोटेंच्या रुपेरी जीवनातील चढ-उतार, 'आम्ही दोघं'मधील उषाताई भटांचे चळवळीतील जीवन, उद्ध्वस्त होऊ पाहणाऱ्या मनाचे मल्लिका अमर शेखने केलेले रेखांकन ही सारी स्त्री-आत्मकथने मराठी 'चरित्र-आत्मचरित्र' वाङ्मयात भर घालणारी ठरली आहेत. मराठीतील सर्वच स्त्री-आत्मकथने लक्षणीय आहेत असे नाही. भावुकतेने, पाल्हाळिकपणाने, आत्मभानाने किंवा पतीच्या सावलीत निमूटपणाने वावरणारी आत्मकथनेही आज आहेत. भाई डांगे यांच्यासारख्या ध्येयवेड्या माणसाची धर्मपत्नी म्हणून उषाताई डांगे यांनी सांगितलेल्या आत्मगौरवी आठवणी, स्नेहांकितातील आत्मश्लाघा आणि स्वत:चा लौकिक जपणारी सावध स्त्री, मुक्ताबाई दीक्षितांचे सामान्य असे प्रचितीचे बोलणे, विवाहबाह्य संबंधाची वाट चालताना वारंवार आत्मसमर्थन करणाऱ्या आनंदीबाई विजापुरे हीसुद्धा स्त्रीजीवनाची अंगेच होत. सामान्य अशी सरळसोट कहाणी सांगणारी अनेक आत्मकथनेही आहेत, त्या सर्वांचा निर्देश करणे केवळ अशक्य आहे.

मात्र, अलीकडच्या काळात ज्या एका धीट पण प्रांजळ आत्मकथनाने मराठी वाङ्मयात चर्चा घडविली ते आत्मकथन म्हणजे 'सांगत्ये ऐका'. एका उद्ध्वस्त मनाचा व जीवनाचा तो आलेखच होय. स्त्रीकडे भोगदासी म्हणून पाहणाऱ्या मानवी विकृतीचे इतके भेदक चित्र आज अन्यत्र नाही. हंसा वाडकरांनी पुरुषी अहंकाराचा मुखवटा फाडून टाकला आहे. स्त्रीच्या

वाटेला आलेले दु:ख, नव्हे लादलेले दु:ख किती भीषण व आसुरी असू शकते आणि या दु:खामुळे स्त्रीमनाची होणारी तडफड किती जीवघेणी असू शकते याचे विदारक चित्र म्हणजे हंसाबाईचे आत्मकथन. अत्यंत मुक्तपणे पण संयततेने आपल्या मनाची दारे उघडण्यात हंसाबाईंना कमालीचे यश लाभले आहे.

दलित स्त्री-आत्मकथनांनी तर एकूण स्त्री-आत्मकथनाला एक नवाच आशय दिला आहे. ही आत्मकथने मनोरंजनासाठी जन्मली नाहीत, की आठवणींचा रम्य चाळा करण्यासाठी. जीवनाचे, विषम समाजस्थितीचे दाहक सत्य प्रतिपादकण्यासाठीच ही आत्मकथने उदयाला आली. अनुभवांच्या वेगळेपणामुळे या आत्मकथनांना सजीवत्व प्राप्त झालेले आहे. आत्मसमर्थनाच्या आहारी न जाता आणि कुणाच्या सहानुभूतीसाठी हात न पसरता ही आत्मकथने उभी आहेत. दलित लेखिकांची 'स्त्री' म्हणून दु:खं आहेतच पण त्यापेक्षाही दलित स्त्री म्हणून तिच्या वाट्याला आलेले जन्मदु:ख शब्दातीत आहे. कोणत्याही दैववादाने किंवा नियतीमुळे तिचे सामाजिक दु:ख जन्मले नाही तर अनीतिशरण आणि वर्चस्वखोर उद्दाम संस्कृतीने तिला अप्रतिष्ठित राखले याचा शिलालेख म्हणजे दलित स्त्री-आत्मकथने. दलित कुटुंबसंस्था, दलित स्त्री-पुरुष यांतील द्वंद्व, रूढीदास्य, पुराण मानसिकता यातून नव्या मानसिकतेची शोधयात्रा या आत्मकथनातून विदारकपणे मांडली आहे. 'जल्माची चित्तरकथा' (शांताबाई कांबळे) सांगतानाच, 'आमचं जिणं' (बेबी कांबळे) किती दाहक आहे, यांचा अंत:स्फोट (कुमुद पावडे) दलित स्त्री आत्मकथनाच्या रूपाने झाला. एका परीने (मिटलेली कवाडे' (मुक्ता सर्वगोड) सताड उघडली. मराठी स्त्री-आत्मकथनाला आपल्या समृद्ध अनुभवांनी योगदान देणारी ही आत्मकथने ठरावीत. आपण जे जीवन जगलो ते अत्यंत निर्भीडपणे व मुक्तपणे व्यक्त करणारी दलित स्त्री-आत्मकथने म्हणजे मराठी आत्मकथनाला गवसलेली एक नवी दिशाच होय.

स्त्री-आत्मकथनाचा प्रवास असा हा बहुवर्ती आहे. संक्षेपात असे म्हणता येईल की, पूर्वायुष्यातील स्मृती कवटाळताना येथे कधी पति सहवासात विरून गेलेले भाबडे व पतिनिष्ठ मन दिसते तर कधी नियतीच्या विळख्यात असहाय्य झालेली मन:स्थिती दृग्गोचर होते. हलक्या फुलक्या रागा-लोभात हरवलेली स्त्री कधी पुढ्यात उभी राहते तर कधी स्त्री-पुरुष संबंधाचा मनोहारी गोफ विणणारी व उकलणारी प्रवृत्ती दिसून येते. कधी विवाहबाह्य संबंधातील अहंपीडित स्पंदने प्रगटताना दिसतात तर कधी आत्मपीडनाच्या थरारक अनुभवांची चित्रेही प्रत्ययाला येतात. माणसाच्या क्रूरतेचे आणि मग्रूर शारीर भुकेचे वस्त्रहरण येथे शब्दांकित झालेले दिसते तर कधी बेलगाम संस्कृतिनिष्ठांचे मनुष्यत्व नाकारणारे औधत्य. ही सारी अनुभवचित्रे कधी नाट्यात्मकतेचा, कधी काव्यात्मकतेचा, कधी सहज-सरळपणाचा, कधी रुक्षता व पाल्हाळपणाचा तर कधी उत्कटतेचा स्पर्श होऊन येतात; कधी चिंतनशीलता, कधी चिकित्सा, कधी भावुकता तर कधी निर्भय-परखडपणाचीही प्रतीती देतात. व्यक्तित्वाचे विविध रंग ल्यालेली ही आत्मकथने म्हणजे मराठी स्त्रीचा सांस्कृतिक इतिहासच होय.

'स्त्री-आत्मकथन' हे मराठीतील महत्त्वाच्या, स्त्री-आत्मकथन करणाऱ्या लेखिकांची आत्मनिवेदने. वेगळे जीवनानुभव, भाषा, काळ आणि विविध संक्रमणे लक्षात घेऊन प्रातिनिधिक स्वरूपाच्या आत्मकथनांचे येथे संपादन केले आहे. हे संपादन करताना विविध व्यक्तींचे व संस्थांचे सहकार्य लाभले आहे. त्यांच्याविषयीची कृतज्ञता मनात आहे. आमचे प्रकाशक श्री. शीतल मेहता हे अत्यंत चोखंदळ आणि दृष्टी असलेले आहेत. त्यांच्या स्नेहामुळेच 'स्त्री-आत्मकथन' आकाराला आले. त्यांनी यापूर्वी केलेल्या समृद्ध प्रकाशनातच याही संपादनाने भर टाकली आहे. त्यांचे मन:पूर्वक आभार !

**संपादक**

✦✦

# अनुक्रमणिका


१. माझी साक्ष........................................ १७
– पंडिता रमाबाई

२. यश आपलेच आहे........................................ २८
– सावित्रीबाई फुले

३. माझे लग्न........................................ ३२
– रमाबाई रानडे

४. यातनागृह........................................ ४३
– लक्ष्मीबाई टिळक

५. खानदानी शेला........................................ ५८
– आनंदीबाई शिर्के

६. मीच हे सांगितले पाहिजे........................................ ७१
– शीलवती केतकर

७. सांगत्ये ऐका........................................ ८४
– हंसा वाडकर

८. स्वप्नांची ओंजळ........................................ ९४
– आनंदीबाई विजापुरे

९. माज्या जल्माची चित्तरकथा........................................ १०८
– सौ. शांताबाई कांबळे

१०. धगधगलेली वस्ती........................................ ११६
– कुमुद पावडे

११. बदलाच्या खुणा........................................ १२६
– मुक्ता सर्वगोड

१२. जिणं आमुचं........................................ १३५
– बेबी कांबळे

१३. उद्ध्वस्त........................................ १४६
– मल्लिका अमर शेख

■ परिशिष्ट........................................ १५३


✦✦

# माझी साक्ष

पंडिता रमाबाई

माझे वडील मूळचे मंगळूर जिल्ह्याचे रहिवासी होते; परंतु त्यांनी म्हैसूर प्रांताच्या सीमेवर पश्चिम घाटातील उंच शिखरावरील घनदाट जंगलाची जागा शोधून त्या ठिकाणी स्वत:चे घर बांधले. जगातील कटकटींपासून दूर राहून शिक्षणकार्य करता यावे, शांत स्थळी देवदेवतांची भक्ती करता यावी व सतत भेटीसाठी येणाऱ्यांचा त्रास टाळता यावा याकरीता त्यांनी असे केले होते.

ते जरी सनातनी हिंदू होते आणि स्वत:च्या जातीच्या व धर्माच्या नियमांचे काटेकोर पालन करणारे होते, तरी ते स्वत: समाजसुधारक होते. स्त्रियांनी व शूद्र जातीच्या लोकांनी संस्कृत भाषा लिहायला-वाचायला का शिकू नये आणि वेद व इतर धार्मिक पुस्तके त्यांनी का जाणू नयेत हे त्यांना समजत नसे; म्हणून त्यांनी इतर ब्राह्मणांकडून स्वत:ला जातिबहिष्कृत केले जाण्याची पर्वा न करता आपल्या पत्नीला-माझ्या आईला-संस्कृत भाषा शिकविण्याचा निश्चय केला.

त्यासंबंधीचा उपदेश दुसऱ्यांना करण्यापेक्षा, आपल्या घरीच त्याचा प्रयोग करणे त्यांना बरे वाटले. त्यांच्या या योजनेच्या चौकटीत बसणारी योग्य विद्यार्थिनी अशी माझी आई त्यांना मिळाली, आणि पुढे ती संस्कृतमध्ये पारंगत झाली. ती

घरची सर्व कामे करी. स्वयंपाक करणे, धुणे, भांडी घासणे, इतर घरगुती कामे करणे, मुलांची योग्य निगा राखणे, पाहुण्यांचे आदरातिथ्य करणे, तसेच मातेची व धर्मपत्नीची सर्व कर्तव्ये ती पार पाडीत असे. तिच्या वेळेतील रात्रीचे बरेच तास ती पुराणातील पवित्र वाङ्मयाचा अभ्यास करण्यात खर्च करी. अशा प्रकारे बरेच ज्ञानार्जन ती करू शकली.

माझे वडील जे काही करीत होते त्याबद्दल काही लोकांनी त्यांचा सन्मान केला, तर काहींनी उपहास केला. त्यांनी लोकांकडे लक्ष न देता जे योग्य वाटले ते केले. माझ्या आईला, भावाला, बहिणीला व इतरांना त्यांनी शिकविले व सुशिक्षित केले.

त्यांच्या स्वत:च्या भात-शेतीचा व नारळाच्या झाडांच्या उत्पन्नाचा भाग त्यांना मिळत असे. त्यांनी जी जागा स्वत:च्या घरासाठी निवडली होती ती तीर्थाचे क्षेत्र असल्यामुळे वर्षभर यात्रेकरू त्या ठिकाणी येत असत. त्यांना असे वाटत होते की, त्या सर्व यात्रेकरूंची बडदास्त ठेवणे व तीही स्वत:च्या खर्चाने ठेवणे आपले कर्तव्य आहे. कारण आदरातिथ्य करणे हा त्यांच्या धार्मिक बाबींचा एक भाग होता. तेरा वर्षेपर्यंत ते तेथे शांतपणे राहून आपले काम करीत होते; परंतु त्यांच्या कर्तव्यपरायणतेने त्यांना मोठ्या खर्चात पाडले व त्यांची सर्व मालमत्ता हळूहळू नाहीशी झाली.

त्यामुळे घर सोडून यात्रेकरूचे जीवन कंठणे त्यांना भाग पडले. माझ्या आईने मला सांगितले की, त्यांनी घर सोडले तेव्हा मी फक्त सहा महिन्यांची होते. तिने मला वेताच्या मोठ्या टोपलीत ठेविले, आणि एका माणसाने ती टोपली डोक्यावर घेऊन डोंगरमाथ्यावरून खाली आणली. अशा प्रकारे माझ्या यात्रेकरूंच्या जीवनाला मी बालवयात असतानाच सुरुवात झाली. कुटुंबात मी सर्वात लहान होते.

मी आठ वर्षांची झाली तेव्हा माझ्या आईने मला शिकविण्यास सुरुवात केली आणि मी पंधरा वर्षांची होईपर्यंत तिने शिकविले. त्या काळात तिने माझ्या मनाची अशी काही घडण केली की, दुसऱ्यांची मदत न घेता मी स्वत: माझा अभ्यास करावा. मुलींना किंवा स्त्रियांना उच्च शिक्षण देण्याच्या शाळा त्या वेळेस असल्याचे माझ्या ऐकिवात नव्हते.

शिवाय आम्हा मुलांचा इतरांशी संबंध येणे माझ्या आईवडिलांना पसंत नव्हते. आम्ही कट्टर सनातनी व जुन्या श्रद्धेला चिकटून राहणारे असावे अशी त्यांची इच्छा होती, म्हणून संस्कृतशिवाय दुसरी भाषा शिकण्याचा आमच्या बाबतीत प्रश्नच नव्हता.



मला आठवते तेव्हापासून माझे आईवडील एका तीर्थक्षेत्राहून दुसऱ्या तीर्थक्षेत्राला प्रवास करीत असत. त्या प्रत्येक ठिकाणी काही महिने ते राहात असत. पवित्र नदीत किंवा तलावात स्नान करीत, देवळांना भेटी देत, कुलदैवतांची व देवळातील देवांच्या मूर्तींची पूजा करीत, आणि मंदिरात किंवा सोयीच्या एखाद्या स्थळी पुराणाचे वाचन करीत असत.

पुराणाचे वाचन करण्यात त्यांचा दुहेरी हेतू असे. पापापासून मुक्त होणे आणि मोक्षप्राप्तीस्तव पुण्य मिळविणे हा पहिला व अत्यंत महत्त्वाचा हेतू होता, आणि दुसरा भिक्षा न मागता प्रामाणिकपणे रोजची उपजीविका करणे.

जेव्हा पुराणाचे वाचन पुराणिक करतात तेव्हा थोड्या वेळासाठी का होईना, पण काही श्रोते निश्चित त्यांच्याजवळ येऊन बसून ऐकतात व त्यांना काहीतरी दान देत असतात. ऐकणारे येतात, जातात पण पुराणिक त्यांच्याकडे ते काय करतात याकडे लक्ष न देता आपले वाचन तसेच चालू ठेवितो. लोक इच्छेस येईल तसे येतात व जातात. देणारा शक्य तितक्या उदारपणे देण्याचा प्रयत्न करतो. या प्रकारे सार्वजनिक स्थानात पुराण वाचून पुराणिकाला नित्य गरजेच्या वस्तू मिळतात.

माझे आईवडील हाच व्यवसाय करीत. आम्ही सर्व, सार्वजनिक ठिकाणांत पुराणाचे वाचन करीत होतो; परंतु त्यांचे स्पष्टीकरण अथवा खुलासा करीत नव्हतो, किंवा व्यावहारिक भाषेत त्यांचे भाषांतर करीत नव्हतो. पवित्र ग्रंथांचे वाचन व श्रवण यातच मोठे पुण्य प्राप्त होते असा हिंदूंचा विश्वास होता. आमच्या जीवनचरितार्थासाठी काम करणे किंवा भिक्षा मागणे आम्ही कधी केले नाही. आम्हास आवश्यक असलेले अन्न व पैसा भरपूर मिळे. आमच्या गरजा भागल्यावर उरलेले, आम्ही यात्रेकरूंना व ब्राह्मणांना दान म्हणून देत होतो.

माझे वडील अशक्त होऊन त्यांना पुराणवाचनाचे श्रम झेपेनासे होईपर्यंत आमचा जीवनक्रम याप्रमाणे होता. पुढे पुराणांचे वाचन करण्याचे श्रमही त्यांना अशक्य झाले. जीवनचरितार्थाकरिता हिंदूंच्या धर्मग्रंथांच्या वाचनाशिवाय इतर सर्व गोष्टीत आम्ही पूर्ण अज्ञानी होतो.

आम्हीच स्वत: आम्हावर ओढवून आणलेला दुष्काळ आम्हाला भोगावा लागला. आम्ही त्या वेळी राहात असू त्या इलाख्यात (मद्रास इलाखा) सुद्धा दुष्काळाची झळ पोचली होती. अन्नपाण्याची फार मारामार होती. भोवतालचे लोक